संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अभियांत्रिकीतील अभिमानास्पद अध्याय

फेब्रुवारी, मार्च या महिन्यात विद्यार्थ्यांना परीक्षांचे वेध लागलेले असतात. मग त्या शालेय परीक्षा असतील किंवा शालांत परीक्षा असतील. साधारणपणे एप्रिल अखेरपर्यंत या परीक्षा संपतात. मात्र याच काळात वैद्यकीय आणि अभियांत्रिकी किंवा औषध निर्माण म्हणजेच फार्मसीच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षांचा हंगाम सुरू होतो. एमएचटी-सीईटी परीक्षासुद्धा याच काळात होतात. ही महाराष्ट्र राज्य सामायिक परीक्षा मानली जाते. जी दिल्यानंतर व्यावसायिक पदवी पदव्युत्तर फार्मसी आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा होते. ज्यामध्ये पीसीबी आणि पीसीएम अशा दोन गटांमध्ये विभागणी केली जाते. या प्रवेश परीक्षा दिल्याशिवाय विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमाला सुरुवात करता येत नाही. यातला उत्साहवर्धक किंवा समाधानकारक भाग असा आहे की, ही प्रवेश परीक्षा देणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढते आहे. परंतु गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी एमएचटी-सीईटी परीक्षेसाठी तब्बल पावणेदोन लाख जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्यावर्षी या परीक्षेला प्रत्यक्षात सात लाख पंचवीस हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातल्या सहा लाख पंचेचाळीस हजार विद्यार्थ्यांनी शुल्क भरून परीक्षाही दिली होती. यंदा तब्बल ८ लाख ९४ हजार ७३४ विद्यार्थ्यांनी या प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी केलेली आहे. यातल्या ७ लाख ६४ हजार ३६८ विद्यार्थ्यांनी शुल्क भरून आपली नोंदणी निश्चितही केलेली आहे. प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत झालेल्या या लक्षणीय वाढीचे अत्यंत महत्त्वपूर्ण निष्कर्ष निघतात जे केवळ परीक्षेपुरते निगडीत नाहीत. तर एकूणच विद्यार्थ्यांचा वेगवेगळ्या अभ्यासक्रमांविषयी ओसंडून जाणारा उत्साह त्यात दिसतो. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी वेगळी परीक्षा घेतली जाते. या अभ्यासक्रमाच्या जागा मर्यादित असतात. तरीही दरवर्षी तिथेही विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. म्हणजेच आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी अधिकाधिक चांगला अभ्यासक्रम निवडून त्यात यशस्वी होण्याची विद्यार्थ्यांची जिद्द लक्षात घेतली पाहिजे.

**आठ लाखांवर विद्यार्थ्यांचा प्रतिसाद**

बारावीनंतरचे हे असे शैक्षणिक वळण असते की, जिथून एका नव्या जीवनप्रवासालाच सुरुवात होते. साधारणपणे त्याला हल्लीच्या भाषेत उत्तम करिअर करण्याची विद्यार्थ्यांमधली महत्त्वाकांक्षा दहावी-बारावीनंतरच निश्चित होते. प्रवेश परीक्षांमधील विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेतली तर विद्यार्थ्यांची व्यावसायिक किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना सर्वाधिक पसंती असल्याचे त्यातून निर्धारित होते. इंजिनिअर होणे आणि आपल्या करिअरला एक स्थिरस्थायी स्वरूप आणणे सर्वच विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असते. गेल्या काही वर्षांत अभियांत्रिकी तंत्रज्ञानाने खूप नवनवीन टप्पे पार केलेले आहेत. केवळ कॉम्प्युटर सायन्स किंवा इलेक्ट्रीकल मेकॅनिकल, सिव्हील यापुरताच हा अभियांत्रिकी अभ्यासक्रम मर्यादित राहिलेला नाही. आता त्यामध्ये एन्व्हायरनमेंटल इंजिनिअरिंग, एअरनॉटिक्स इंजिनिअरिंग, आर्टिफिशिअल इंटिलिजन्स, स्पेस टेक्नोलॉजी अशा एक ना अनेक क्षेत्रांमध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. याचा उपयोग स्वतःची आवड छंद जोपासण्याकरीता तर होतोच. परंतु संशोधन क्षेत्रातही मोठा वाव मिळू शकतो. भारतातल्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना परदेशातूनही मोठी मागणी आहे. मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट आणि सतत वाढत जाणारे पॅकेज याचा विचार केला तर कोणताही अभियांत्रिकी अभ्यासक्रम जर काही नवीन संकल्पनांना जोडून पूर्ण केला गेला तर त्याला अमर्याद संधी उपलब्ध होऊ शकतात. सरकारने देशातील आयआयटी आणि आयआयएम महाविद्यालयांची संख्या वाढवली आहे. हा अभियांत्रिकी अभ्यासक्रम स्वीकारलेले अनेक विद्यार्थी पुढच्या टप्प्यात आयआयटीमध्ये प्रवेश घेऊन आपल्याच विषयातला अधिक अभ्यास करू इच्छितात. आणि एकदा का आयआयटीचे लेबल जोडले गेले की, त्यांच्या पॅकेजलाही अधिक मागणी येते. म्हणजेच अभियांकी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून पुढचा संशोधनात्मकही अभ्यास विद्यार्थ्यांना करता येतो. ज्यांची आर्थिक क्षमता असते ते विद्यार्थी एमएस करण्यासाठी परदेशातही जात असतात. ज्या संख्येने अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला पसंती मिळते आहे यावरून या क्षेत्रातल्या अनेक नव्या संधी साधण्याचा विद्यार्थ्यांचा हेतू दिसतो. आता तर नव्या शैक्षणिक धोरणानुसार एकाचवेळी दोन अभ्यासक्रम पूर्ण करता येतील.

**अन्यथा महत्त्वाकांक्षेचे खच्चीकरण**

महाराष्ट्रापुरता विचार केला तर आठ लाखांवर विद्यार्थ्यांचे अभियंता होण्याचे हे स्वप्न म्हणजे त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या पंखांना नवे बळ मिळाल्याचेच म्हणावे लागते. आतापर्यंतची ही सर्वाधिक संख्या असल्याने अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठीचा हा अभिमानास्पद अध्याय आहे असेच त्याचे वर्णन करावे लागेल. प्रश्न एवढाच उरतो की विद्यार्थ्यांना आपले करिअर घडवून भवितव्य उज्ज्वल करायचे असते यासाठी त्यांच्या बुद्धीमत्तेला पुरेसा वाव देणारी परिपूर्ण अभियांत्रिकी महाविद्यालये गरजेची ठरतात. अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा असतात. प्राध्यापक वर्गही जेमतेम स्वरूपाचा असतो. आणि शुल्कवसुलीबाबतही पठाणी पद्धतीने नियम राबवले जात असतात. म्हणजे आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी सर्व प्रकारच्या कसोट्या पार करण्याची विद्यार्थ्यांची तयारी असते. परंतु अनेक महाविद्यालयांमध्ये गैरकारभाराचीच त्यांना परीक्षाच द्यावी लागते. सरकारने या तरुण वर्गाच्या महत्त्वाकांक्षेला नीट समजून घेतले पाहिजे. गुणवत्ता आणि बुद्धीमत्ता याचा योग्य समन्वय घडवायचा असेल तर त्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये तितकेच उत्साहवर्धक वातावरण राहील याची काळजी सरकारने घेतली पाहिजे. ही मोठी संख्या म्हणजे महाराष्ट्राच्या गुणसंपदेचे संचित आहे जे जपायला पाहिजे. विद्यार्थ्यांमधल्या या महत्त्वाकांक्षेचा सन्मान कसा होईल यासाठी तितकेच आधुनिक आणि उत्तम स्वरूपाचे धोरण तयार केले पाहिजे. अन्यथा महाराष्ट्रासारख्या पुरागोमी राज्यात उच्चशिक्षणाच्या इच्छाशक्तीचेच खच्चीकरण झाल्याचे म्हणावे लागेल. केवळ सामायिक प्रवेश परीक्षा घेणे, प्रवेश सुनिश्चित करणे किंवा विनाअनुदानित महाविद्यालयांची खिरापत वाटणे एवढ्यापुरतीच सरकारची जबाबदारी ठरत नाही.